**“महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक स्पर्धा”**
**आयोजित करण्याबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण १०२२/प्र.क्र.४६/क्रीयुसे २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन
मुंबई - ४०००३२
दि. ०१ जून, २०२२

<u>संदर्भ</u> - शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग बैठक -३४१४/प्र.क्र. ३६/१४/ क्रीयुसे - २ दि. ८ जुलै २०१४

<u>प्रस्तावना .</u>

राज्यात क्रीडामय वातावरण निर्माण करून विविध खेळांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर आपले नैपुण्य दाखवित असलेल्या खेळाडूंना स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी व राष्ट्रीय खेळ स्पर्धेच्या दृष्टीने खेळाडूंची तयारी व्हावी. याकरिता महाराष्ट्र ऑलिम्पीक असोशियशनमार्फत राज्यात विविध ठिकाणी मिनी ऑलिम्पिक स्पर्धा आयोजीत करण्याचा निर्णय या विभागाच्या शासन निर्णय दि. ०८जुलै, २०१४ अन्वये घेण्यात आलेला आहे. तथापि काही कारणास्तव सदर स्पर्धा झाल्या नाहीत.

२. सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या परिच्छेद ५२ मध्ये “विविध खेळांना उत्तेजन देण्यासाठी व खेळाडूंना स्पर्धात्मक अनूभव मिळावा यासाठी महाराष्ट्र ऑलिपीक असोसिएशनच्या सहकार्याने मिनी ऑलिपीक स्पर्धा आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे, याचा लाभ दिव्यांग खेळाडूंच्या क्रीडा प्रोत्साहन देण्यास देखील होईल” अशी घोषणा केली आहे. तथापि कोविडमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये या स्पर्धांच्या आयोजनाबाबत विचार झालेला नाही. या स्पर्धाचे आयोजन महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या अनुषंगाने सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, खेळाडुंच्या प्रवासाची साधने इ. बाबी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यासाठी राज्यस्तरावर एक उच्चस्तरीय समिती व पुणे येथे मुख्य स्पर्धा आयोजन समिती अशा दोन समित्या गठीत करण्याची व त्यांची कार्यकक्षा ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय</u>

राज्यात क्रीडामय वातावरण निर्माण करून विविध खेळांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने तसेच खेळाडूंना स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी व नॅशनल गेम्सच्या दृष्टीने खेळाडूंची तयारी व्हावी याकरिता राज्यात “महाराष्ट्र स्टेट ऑलिम्पिक गेम्स” चे आयोजन महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र

ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २०२२ या वर्षामध्ये मध्ये करण्यात येत आहे. संदर्भाधीन दिनांक ०८ जुलै, २०१४ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन या स्पर्धेचे आयोजन व संनियंत्रनाकरीता खालीलप्रमाणे समित्या गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ) **राज्यस्तरीय स्पर्धा आयोजन समिती**

मा . मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रमुख आश्रयदाते.

मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रमुख आश्रयदाते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण. | अध्यक्ष |
| २ | मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण. | कार्याध्यक्ष |
| ३ | अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन | कार्याध्यक्ष |
| ४ | अपर मुख्य सचिव, /प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | उपाध्यक्ष |
| ५ | अपर मुख्य सचिव, वित्त विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ७ | सह/उपसचिव (क्रीडा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ८ | सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, (मुख्यालय) पुणे. | सदस्य |
| ९ | ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारार्थी / अर्जुन पुरस्कारार्थी / द्रोणाचार्य पुरस्कारार्थी. ( १ प्रतिनिधी) | सदस्य |
| १० | महासचिव, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (संघटन सचिव) | सदस्य |
| ११ | कार्यकारिणी सदस्य, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (समन्वयक) | सदस्य |
| १२ | उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, (शिवछत्रपती क्रीडापीठ) पुणे. | सदस्य |
| १३ | उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, (मुख्यालय) पुणे. | सदस्य |

वरीलपैकी अ. क्र. ९ येथील सदस्य मा. अध्यक्ष यांनी नामनिर्देशित केल्यानुसार राहतील व अ. क्र. ११ येथील सदस्य मा. अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांनी नामनिर्देशित केल्यानुसार राहतील .

- **या समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील** :-

१) “महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक ” स्पर्धेच्या आयोजनासाठी आराखडा व धोरण ठरविणे.

२) “महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक ” स्पर्धा आयोजना संबंधातील विविध अंदाजपत्रकास मान्यता देणे.

३) स्पर्धेच्या निधी वाटपाबाबत किंवा निधीशी संबंधित धोरण ठरविणे.

(ब) **मुख्य स्पर्धा आयोजन समिती**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रमुख आश्रयदाते.

मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रमुख आश्रयदाते.

मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण,महाराष्ट्र राज्य, प्रमुख आश्रयदाते.

मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण, महाराष्ट्र राज्य, प्रमुख आश्रयदाते.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे. | : | अध्यक्ष |
| २ | जिल्हाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | | सदस्य |
| ३ | पोलीस आयुक्त पुणे किंवा त्यांचे प्रतिनिधी | | सदस्य |
| ४ | आयुक्त पुणे / पिंपरी चिंचवड महानगरपालिका किंवा त्यांचे प्रतिनिधी | | सदस्य |
| ५ | आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | | सदस्य |
| ६ | अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी | | सदस्य |
| ७ | सह/उपसचिव (क्रीडा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई | : | सदस्य |
| ८ | सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे. | : | सदस्य |
| ९ | उपसंचालक, क्रीडा व यवुक सेवा, शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे | : | सदस्य |
| १०. | महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे दोन उपाध्यक्ष (अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांनी नामनिर्देशित केलेले) | | सदस्य |
| ११ | महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे दोन सहसचिव ((अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांनी नामनिर्देशित केलेले) | | सदस्य |
| १२ | महासचिव महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन | | सदस्य |
| १३ | उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, (मुख्यालय) पुणे. | | सदस्य सचिव |

**या समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील :-**

१. महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक स्पर्धेच्या आयोजनासाठी खेळ प्रकार, तारखा व ठिकाण निश्चित करणे .

२. स्पर्धेचे वेळापत्रक व ठिकाणे संबंधित राज्य संघटनांना कळविणे व त्यांच्याकडून प्रवेशिका मागविणे.

३. वाईल्ड (wild) कार्ड प्रवेश देण्याचे अधिकार समितीस राहतील.

४. स्पर्धेची प्रसिध्दी मोठया प्रमाणात करणे . तसेच, विविध विभाग / कंपनी / कार्पोरेट सेक्टर यांचेकडून प्रायोजकत्व घेण्याचे अधिकार समितीस/ महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांना राहतील.

५. सदर स्पर्धेचे ब्रॉडकॉस्टींग करण्याचे अधिकार समितीस / महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांना राहतील.

६. या स्पर्धेकरिता आश्यकतेनुसार विविध खर्चाच्या बाबींसाठी विहित कार्यपद्धतीनुसार निविदा मागवून अंतिम करणे.

७. स्पर्धेचे उदघाटन व समारोपाचे आयोजन करणे.

८. "क्रीडा ज्योत" चे नियोजन करणे.

९. स्पर्धा अनुषंगिक स्थानिक स्तरावर आवश्यकतेनुसार करण्याचे अधिकार समितीस राहतील .

१०. "महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक " स्पर्धेच्या खर्चाचा हिशोब ठेवणे.

११.सनदी लेखापालांमार्फत लेखापरिक्षण करून घेणे.

१२.स्पर्धेच्या आयोजनाच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेणे.

१३. महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक स्पर्धा समारोपानंतर त्याच्याशी संबधित सर्व कामकाज संपुष्टात आल्यावर वरील दोन्ही समित्या आपोआप संपुष्टात येतील.

२. उपरोक्त दोनही समित्यांच्या कार्यकक्षेत तसेच इतर बाबीमध्ये बदल करण्याचे अधिकार सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना राहतील

३. **<u>" महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक " स्पर्धेचे आर्थिक व्यवहार</u>** :-

"महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक " करिता शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीसाठी लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, हे आहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांना नियंत्रक अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे. तसेच संबंधित निधी आहरित करून मुख्य स्पर्धा आयोजन समितीच्या बँक खात्यात वर्ग करण्यात यावा. समितीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात यावे. समितीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात यावे. मुख्य स्पर्धा आयोजन समितीचे सदस्य सचिव ( उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा मुख्यालय पुणे) व महासचिव महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या संयुक्त स्वाक्षरीने आर्थिक व्यवहार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४ . या स्पर्धेसाठी विविध बाबींवर होणारा खर्च कमीत कमी असावा आणि कोणत्याही परिस्थितीत या स्पर्धेसाटी मंजूर तरतूदीच्या मर्यादेत ठेवण्यात यावा .तसेच स्पर्धेसाठी खर्च करताना सर्व वित्तीय नियम /विनिमय / शासन निर्णय इत्यादींचे पालन करणे बंधनकारक राहील

५. यासाठी होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष "२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४ क्रीडा व खेळ (०२) (०१) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना सहाय्यक अनुदान -३१ सहाय्यक अनुदाने (२२०४ - १९४३)" या खाली खर्ची टाकण्यात यावा. यासाठी होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष "२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४ क्रीडा व खेळ (०२) (०१) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना सहाय्यक अनुदान -३१ सहाय्यक अनुदाने (२२०४ - १९४३)" या खाली खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०६०११८०२३५००२१ असा आहे .हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramdas Ganpat Dhumal

Digitally signed by Ramdas Ganpat Dhumal
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3246a8286e67ae7423b98bfd800865585eb8601521f097ab07142d65ea9b2b15, pseudonym=081ECC13959FDFAE420D6448809AEDBED849D4B4, serialNumber=24F4ACDDCFF993441F6C634862546E9D122E0DB556806B179B794879ACF360F5, cn=Ramdas Ganpat Dhumal
Date: 2022.06.01 18:04:33 +05'30'

**(रामदास धुमाळ )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत.**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा.मंत्री ( क्रीडा व युवक कल्याण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा.राज्य मंत्री ( क्रीडा व युवक कल्याण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.

७) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

८) प्रधान सचिव नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई-३२.

९) प्रधान सचिव वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२.

१०) सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) -१/२, महाराष्ट्र , मुंबई/नागपूर.

१२) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१/२,महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

१३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१५) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, (क्रीडा संचालनालयामार्फत)

१६) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)

१७) वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई-३२.

१८) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१९) निवड नस्ती (क्रीयुसे-२)